Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# एक अखंड निर्झर

14 Oct 2011, 0327 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

महाराष्ट्राच्या पटलावर १७व्या शतकात होऊन गेलेले समर्थ रामदासस्वामी हे लोक-विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. आपल्या जीवनकाळात समर्थांनी दष्टेपणाने घरातल्या लहान मुलांपासून ते समाजाचे नेतृत्व करू इच्छिणाऱ्या राजकारण्यांपर्यंत सर्वांना लाभ-दायी ठरेल असा उपदेश केला. आज ४०० वर्षांनंतरही त्याचे मूल्य व उपयुक्तता कमी झालेली नाही.

माझे वडील रोज दासबोधातील समास वाचायचे. त्यामुळे अगदी न कळत्या वयातच माझा दासबोधाशी आणि समर्थांशी परिचय झाला. पुढे बांधकाम व्यवसायापासून ते शेतीपर्यंत आणि शिक्षणसंस्था चालवण्यापासून ते पूर्वजांचा इतिहास ग्रंथबद्ध करण्यापर्यंत अनेक कामे करताना, समर्थांची वाणी, शिकवण बरोबर असल्याचा फायदा अनुभवला. आधुनिक काळातील मॅनेजमेंट एक्सपर्टसचा सल्ला व समर्थांची शिकवण यातील साम्य जाणवले. व्यक्तिमत्त्व-विकासाचा इनसाईड-आऊट अॅप्रोच असो किंवा मॅनेजमेट बाय ऑबजेक्टीव्ह असो, ही सारी तत्त्वे समर्थ रामदासांच्या शिकवणुकीत वेगळ्या रूपात आढळतात. त्यामुळे रामदासस्वामींची शिकवण, त्यांचे लेखन म्हणजे एक अखंड वाहता निर्झर आहे याची खात्री पटली.

तुम्ही शालेय विद्यार्थी असा किंवा उद्योजक, तुम्ही एखाद्या पक्षाचे नेते असा किंवा चळवळीतले कार्यकर्ते, तुम्हाला मार्गदर्शक, यशाचा मंत्र सांगणारे विचार समर्थांच्या लेखनात मिळतील. समर्थांचे हे वचनच पाहा- अभ्यासे प्रगट व्हावे। नाही तरी झांकोन असावे। प्रगट होऊन नासावे। हे बरे नव्हे।। ही गोष्ट विद्यार्थ्यांपासून ते राजकीय नेत्यां-पर्यंत सर्वांनाच लागू पडते. अति क्रोध करू नये। जिवलगांस खेदू नये। मनी वीट मानू नये। सिकवणेचा।। हा उपदेश संसार करणाऱ्यांपासून ते समाजसेवा करणाऱ्या नेत्यांपर्यंत अनेकांना मार्गदर्शक ठरतो.

परपीडेचे मानी सुख। परसंतोषाचे मानी दु:ख। गेले वस्तूचा करी शोक। तो एक मूर्ख।। हे समर्थांनी सांगितलेले मूर्ख लक्षण माहीत असेल तर तसे वर्तन हातून घडणार नाही आणि तुम्ही मूर्ख ठरणार नाही. मनाचे श्लोक लिहून मानवी मनाचे सार्मथ्य आणि मर्यादा स्पष्ट करणाऱ्या समर्थांनी सांगितलेले सेल्फ डेव्हलपमेंटचे फंडे अतियश प्रभावी आहेत. जे दुसऱ्यास सांगावे। तें तुंवा स्वयेसि करावे। ऐसे केलिया स्वभावे। समाधान सकळिका।। जो उपदेश आपण दुसऱ्याला करतो, तो स्वत: आचरणात आणला तर त्याचा फायदा सगळ्यांनाच होईल.

समर्थांचा सामुदायिक प्रयत्नां-वर अधिक विश्वास होता. नेतृत्व असावेच; पण या नेतृत्वाला जनाधार मिळवता आणि टिकवता आला पाहिजे अशी त्यांची धारणा होती. आपण येकायेकी येकला। सृष्टीत भांडत चालिला। बहुतांमध्ये येकल्याला। येश कैचे। हाती घेतलेल्या कार्यात यश मिळवायचे सर्वांचे सहकार्य मिळवले पाहिजे. सगळ्यांशी भांडण करून पुढे जात येणार नाही, हा उपदेश कॉर्पोरेट सेक्टरपासून ते सामाजिक क्षेत्रा-पर्यंत सर्वत्र उपयोगी ठरणारा आहे.

समर्थ रामदासस्वामींच्या या सगळ्या शिकवणुकीचं अवलोकन केल्यानंतर, आपल्या निर्वाण प्रसंगी त्यांनी काढलेले माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंत:करणी।। परि मी आहे जगज्जीवनी। निरंतर।। या उद्गारांची खात्री पटते.

- डॉ. सुधीर निरगुडकर

Network Access Message: The page

Tweet या बातमीला ट्विट करा

**या बातमीवरच्या एकूण प्रतिक्रिया (1)** वाचा अन्य वाचकांच्या प्रतिक्रिया आणि तुमची प्रतिक्रिया लिहा.

इतर बातम्यांचे व्हिडिओ पाहण्यासाठी क्लिक करा

Powered by Indiatimes

About Us | Advertise with Us | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2011 Bennett Coleman & Co. Ltd. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768